

# स्वप्नवासवदत्ता

ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय ८१८.९१.
क्र. ५८३५
IRBK-0105435

संस्कृत
साहित्य
सरिता
:९

भास-कृत

# स्वप्नवासवदत्ता

कथासार
अमरेन्द्र



IREK-0105435
IRBK-0105435

वोरा अँन्ड कंपनी, पब्लि

प्रकाशक ।
एम्. के. वोरा
वोरा अँन्ड कंपनी,
पब्लिशर्स (प्रायव्हेट) लि०
३ राउंड बिल्डिंग,
काळबादेवी रस्ता, मुंबई २

किंमत सहा आणे
पहिली आवृत्ती । १९५६
सर्वाधिकार प्रकाशकाधीन

मुद्रक ।
अनंत चिंतामण रायरीकर
'स्वस्तिक मुद्रणालय'
४३९ शनवार पेठ, पुणें २

# संस्कृत-साहित्य-सरिता

विशाल महासागराला असंख्य नद्या येऊन मिळत असतात. अशा अगणित नद्यांनींच अमर्याद सागर बनलेला असतो. संस्कृत साहित्याचा महासागरहि असाच अनेक सरितांनीं समृद्ध झालेला आहे. ' संस्कृत-साहित्य-सरिता ' असें नांव दिलेल्या या वाङ्मयमालेंतून आपली आदिभाषा जी संस्कृत तिच्यांतील उत्तम उत्तम वाङ्मयाचा कथारूपानें थोडक्यांत परिचय करून देण्याचें आम्ही योजिलें आहे. संस्कृत वाचणारे थोडे आणि समजणारे तर त्याहून कमी. तेव्हां आजच्या सर्वसामान्य माणसाला, लिहितां-वाचतां येऊं लागलेल्या नवशिक्षितालाहि या संस्कृत-वाणीचा आस्वाद कसा घेतां येणार ? परंतु त्यांना तो मिळणें तर आवश्यक आहे; कारण संस्कृत भाषेंतील वाङ्मय हा आपला फार थोर वारसा आहे. तो गमावणें म्हणजे सर्वस्वच गमावून बसणें. यासाठींच संस्कृत भाषेंतील थोर, प्रसिद्ध अशा वाङ्मयकृतींचें, नाटकांचें आणि काव्यांचें, कथासार आम्ही वाचकांपुढें सादर करीत आहोंत.

आम्ही असें समजतों कीं, देवभाषेंतील या वाङ्मयीन कलाकृतींचा परिचय करून देण्याची आमची ही योजना एक चांगली योजना आहे—एक सत्संकल्प आहे. आणि असे सत्संकल्प उत्तम रीतीनें तडीला नेण्याचें काम जनताजनार्दनाचेंच आहे. तें तसें घडो, हीच इच्छा.

—प्रकाशक

# परिचय

'स्वप्नवासवदत्ता'चा कर्ता भास हा कालदृष्ट्या आद्य कवि मानला जातो. याचीं तेरा नाटकें उपलब्ध आहेत; आणि तीं अगदीं अलीकडेच प्रकाशांत आलेलीं आहेत. भासाच्या या सर्व नाटकांचा उगम गुणाढ्याच्या 'बृहत्कथे'त असल्याचें कांहीं विद्वानांचें मत आहे. परंतु कांहींच्या मतें भास हा वत्सराज उदयनाचा समकालिन असल्यामुळें त्यानें प्रत्यक्ष ऐतिहासिक सत्यावर आधारूनच आपलें हें नाटक लिहिलेलें आहे.

भासाच्या म्हणून मानल्या जाणाऱ्या एकूण नाटकांत सरसतेच्या दृष्टीनें 'स्वप्नवासवदत्ता'चा क्रमांक पहिला लागलेला आहे. सुबोध, सरळ रचना हा भासाचा गुण आहेच. " कविताकामिनीचें हास्य " म्हणून गौरविल्या गेलेल्या या महाकवीचें हें नाटक मानवी स्वभाव-दर्शनाचा एक अप्रतिम नमुना आहे.

वत्सराजा उदयन आणि मगधाची राजभगिनी पद्मावती यांच्या विवाहाची कथा या नाटकांत सांगितलेली असली तरी, खरें म्हणजे उदयनाची पहिली पत्नी व पट्टराणी वासवदत्ता हिचें साहसी पतिप्रेम आणि मंत्री यौगंधरायणाची डोळस स्वामिनिष्ठा यांच्या उदात्त चित्रणासाठींच तें लिहिलेलें दिसतें.

भासाच्या नाट्यकृतींची पूर्वकालीन महाकवींनींहि मुक्तकंठानें स्तुति केलेली आढळते. परंतु दुर्दैवानें अद्यापि तरी या महान कवीविषयीं निश्चितपणें अशी कांहीं माहिती उपलब्ध नाहीं. त्याचीं नाटकें जशीं अचानक हातीं लागलीं तसा त्याचा इतिहासहि असाच अकल्पितपणें हातीं आला तर कोण जाणे !

—लेखक

# स्वप्नवासवदत्ता

वत्सदेशाचा राजा उदयन याचें नांव प्राचीन वाङ्मयांत प्रसिद्ध आहे. याची राजधानी कौशाम्बी येथें होती. उज्जयिनीचा राजा प्रद्योत ‘ चण्डमहासेन ’ याच्या मुलीशीं उदयनानें विवाह केला होता. परंतु हा विवाह सरळपणानें न होतां प्रद्योताच्या इच्छेविरुद्ध राजकन्येला उदयनानें पळवून आणलें होतें. मात्र हा होता प्रीतिविवाह. उदयनाच्या या राणीचें नांव वासवदत्ता. हिचें उदयनावर अतिशय प्रेम होतें.

उदयन मोठा पराक्रमी होता. गायनवादनादि कलांत तो निष्णात होता. त्याचा मंत्री यौगंधरायण आणि सेनापति रुमण्वान हे दोन राजनीतिनिपुण पुरुष त्याच्या राज्याचे दोन मुख्य आधारस्तंभ होते.इतकें असतांनासुद्धां आरुणि राजानें वत्सदेशावर स्वारी केली तेव्हां उदयनाचा पराभव झाला आणि त्याला लावाणक नांवाच्या लहानशा वनप्रदेशाचा आश्रय घ्यावा लागला.

लावाणकांत येऊन राहूं लागल्यावर उदयनाचें सारें लक्ष क्रीडा व शिकार यांतच गुंतून गेलें. आपण राज्य-भ्रष्ट झालों आहोंत याची जाणीवहि तो विसरून गेला. परंतु यौगंधरायण आणि रुमण्वान यांना मात्र त्या परिस्थितीची खंत वाटत होती. वत्सराज उदयन पुन्हां आपल्या राजवैभवानें कसा चमकूं लागेल या विवंचनेंत ते

दोघे होते. आणि त्या दृष्टीनें त्यांनीं एक मोठी योजना ठरविली. तींत राणी वासवदत्तेचा भागच मुख्य असल्यानें तिलाहि सामील करून घेतली. त्यांच्या त्या उद्योगाचेंच चित्र या नाटकांत रंगविलेलें आहे.

१ ***

मगध देशाची राजमाता महादेवी वानप्रस्थाश्रम स्वीकारून तपोवनांत जाऊन राहिली होती. राजगृह राजधानीपासून हें तपोवन फारसें दूर नव्हतें. त्यामुळें महादेवीची मुलगी पद्मावती आपल्या आईच्या भेटीसाठीं तेथें वारंवार येई. मगधाधिपति दर्शकाची पद्मावती ही बहीण होती.

याप्रमाणें एकदां राजभगिनी पद्मावती आईला भेटून तपोवनांतून राजगृहाकडे परत चालली होती. तिचा असा नियम असे कीं तपस्वी लोकांची जी कांहीं इच्छा असेल ती पुरी करून मगच तेथून परतावयाचें. त्याप्रमाणें तिनें आपल्या सेवकाकडून जाहीर करविलें कीं कोणाला कांहीं मागून घ्यावयाचें असेल तर त्यानें पुढें यावें. राजकुमारी आनंदानें सर्वांच्या इच्छा पुऱ्या करील.

इतक्यांत एक म्हातारा ब्राह्मण व एक गरीब तरुण ब्राह्मणी अशीं दोघें पुढें येऊन उभीं राहिलीं. तो ब्राह्मण राजकुमारीला म्हणाला, "ही माझी धाकटी बहीण अवंतिका. हिचा पति कोठें देशान्तराला गेला त्याला बरेच

दिवस होऊन गेले. मी त्याच्या शोधाला जात आहें. परंतु या तरुण बहिणीला बरोबर नेणें म्हणजे माझ्या गळ्यांत एक लोढणेंच होईल. तेव्हां कृपा करून मी परत येईपर्यंत हिला आपल्यापाशीं ठेवून घ्यावी अशी विनंती आहे."

जवळच्या उभ्या असलेल्या कंचुकीला त्या ब्राह्मणाचें तें विलक्षण मागणें ऐकून विस्मय वाटला. तो पद्मावतीला म्हणाला, "या विनंतीचा कसा स्वीकार करणार? तप, द्रव्य आणि प्राण हें सर्व कांहीं देऊन टाकतां येतें पण एखाद्याच्या ठेवीचें रक्षण करणें मोठें कठीण काम आहे!" परंतु राजकुमारीनें म्हटलें कीं, "तें कांहीं नाहीं. एकदां शब्द दिलेला आहे आतां तो पुरा केलाच पाहिजे."

ती बिचारी ब्राह्मणी जड पावलांनीं राजकुमारीपाशीं जाऊन उभी राहिली. राजकुमारीनेंहि तिला प्रेमानें जवळ केलें.

ही ब्राह्मणी खरी ब्राह्मणी नव्हती. ती होती उदयनाची राणी वासवदत्ता. आणि तो म्हातारा होता ब्राह्मणवेषधारी वत्सदेशाचा महामंत्री यौगंधरायण. अर्थात पद्मावतीला हें कांहीं कळायला मार्ग नव्हता. मात्र 'अवन्तिके' नें आपल्या तोंडावरील बुरखा दूर करतांच ती मोठ्या घराण्यांतली मुलगी असली पाहिजे असें राजकुमारीसुद्धां सर्वांनाच वाटलें.

इतकें होतें आहे तों एक ब्रह्मचारी हिंडत हिंडत तेथें आला. तो लावाणकाचाच राहाणारा होता. परंतु तेथें

कांहीं अरिष्ट कोसळल्यामुळें त्याला लावाणक सोडून बाहेर पडावें लागलें होतें. यौगंधरायणानें साहजिक म्हणूनच त्या ब्रह्मचाऱ्याला विचारलें कीं, असें कोणतें अरिष्ट होतें तें?

त्यावर त्या ब्रह्मचाऱ्यानें लावाणकाच्या शिकारघरांत गुदरलेला अनर्थ निवेदन केला. तो म्हणाला कीं, उदयन महाराज लावाणकांत राहातात. ते एकदां शिकारीला गेले असतांना मागें शिकारघराला आग लागून त्यांत महाराणी वासवदत्ता व प्रधान यौगंधरायण हीं दोघेंहि जळून खाक झालीं. महाराज परत आल्यावर त्यांना ही दुर्घटना जेव्हां समजली तेव्हां त्यांनीं आगींत उडी टाकून जीवित संप-विण्याचा निर्धार केला. परंतु मंत्र्यांच्या प्रयत्नामुळेंच केवळ ते जिवंत राहिले आहेत. मात्र ते शोकसागरांत बुडून गेले आहेत. महाराणीचे दागिने स्वतःच्या हृदयाशीं घेऊन त्यांनीं इतका विलाप केला कीं त्यांची शुद्धच हरपली !

ब्रह्मचाऱ्यानें सांगितलेली भयंकर हकीकत ऐकून बाकीची मंडळी दुःखी झालीच; पण वासवदत्तेच्याहि डोळ्यांतून अश्रु ठिबकले. पद्मावतीला वाटलें कीं दुसऱ्याचें दुःख ऐकून स्वतः दुःखी होणारी ही स्त्री खरोखरीच मोठ्या मनाची असली पाहिजे. परंतु वास्तविक राणीला दुःख झालें होतें तें आपल्यावर इतकें गाढ प्रेम करणाऱ्या पतीला फसवून आपण निष्कारणच त्याला दुःखांत लोटलें म्हणून.

यौगंधरायणाच्या तें लक्षांत यावयास वेळ लागला

नाहीं. म्हणून त्यानें लगेच त्या ब्रह्मचाऱ्याला विचारलें कीं, " काय रे, इतकें होऊनसुद्धां कोणा मंत्र्यानें राजाला धीर नाहीं दिला ? "

ब्रह्मचाऱ्यानें उत्तर दिलें कीं, " कां नाहीं ? रुमण्वानानें तर राजाचें सांत्वन करण्यासाठीं कांहींच करावयाचें बाकी ठेवलें नाहीं. राजानें अन्नपाणी सोडलें तसाच तोहि कांहीं न खातां पितां राहिला. शेवटीं मोठ्या प्रयासानें राजाची समजूत घालून तो राजाला तेथून दुसरीकडे घेऊन गेला. आणि राजा निघून गेल्यानंतर तेथें कोण राहाणार ? म्हणून त्या उजाड गांवांतून मीहि बाहेर पडलों. " एवढें सांगितल्यानंतर ब्रह्मचारी आपल्या रस्त्यानें निघून गेला. यौगंधरायणहि आपल्या वाटेला लागला. आणि वासवदत्ताहि पद्मावतीबरोबर तेथून राजधानीकडे चालूं लागली.

परंतु वास्तविक हें सर्व कांहीं अगोदर ठरवून त्या-प्रमाणेंच चाललेलें होतें. लावाणकांतून राजा उदयनाला शिकारीच्या निमित्तानें बाहेर काढणें, मागें वाड्याला आग लावून देणें, त्या आगींत राणी वासवदत्ता व मंत्री यौगंधरायण जळून गेले अशी आवई उठविणें आणि रुमण्वानानें राजाची समजूत घालून त्याला तेथून घेऊन जाणें हें सर्व यौगंधरायणाचें कारस्थान होतें. आणि हें सर्व वत्स देशाच्या कल्याणासाठीं व उदयनाच्या उत्कर्षा-साठींच चाललेलें होतें.

उदयनाला आपलें सम्राटपद गमावून कौशाम्बींतून

बाहेर पडावें लागलें आणि लावाणकासारख्या क्षुद्र वनप्रदेशाचा आसरा घ्यावा लागला. ही परिस्थिति पालटून त्याला पुन्हां पूर्वीचें वैभव प्राप्त करून द्यावयाचें तर कोणातरी जबरदस्त साहाय्यकाची गरज होती. मुत्सद्दी यौगंधरायणाच्या दृष्टीनें असा समर्थ साहाय्यक म्हणजे मगधाचा राजा दर्शक हा होता. त्याचें साहाय्य मिळवावयाचें म्हणजे त्याच्याशीं राजा उदयनाचा कांहींतरी नातेसंबंध उत्पन्न व्हावयाला पाहिजे होता. दर्शक राजाची बहीण पद्मावती वास्तविक उदयनाला अनुरूप होती. पण वासवदत्ता पट्टराणी असतांना जिवंत सवतीवर दर्शक पद्मावती उदयनाला कशी देणार! तथापि हा विवाहसंबंध जुळून येणें राजकारणाच्या दृष्टीनें तर आवश्यक होतें. आणि असें भविष्यहि वर्तविलें गेलें होतें कीं पद्मावती उदयनाची राणी होईल.

या आधारावर यौगंधरायणाचें सारें कारस्थान उभें होतें. अर्थात वासवदत्तेनें या कारस्थानांत भाग घेण्याचें जें कबूल केलें तेंहि केवळ आपल्या पतीला पूर्ववैभव पुनश्च प्राप्त व्हावें या सदिच्छेनेंच.

तपोवनांतून परत फिरतांना त्या ब्रह्मचाऱ्यानें लावाणकांतील दुर्घटना सांगितली तेव्हांच पद्मावतीच्या मनांत उदयनाबद्दल आदर उत्पन्न झाला होता. वासवदत्तेवरील त्याचें प्रेम किती उत्कट होतें तेंहि तिला समजून आलें होतें. ब्रह्मचाऱ्याच्या तोंडून ती हकीकत ऐकल्यापासून पद्मावतीच्या मनांत उदयनाविषयींच्या प्रेमाचा अंकुर फुटूं लागला होता.

२०८८५
ग्रंथालय
विभाग
०९.२
क्रमांक २४९२५

२ ***

पद्मावतीच्या मनांत वाटूं लागलेल्या उदयनाविषयींच्या प्रेमांकुराला खतपाणी घालण्याचें कामच वास्तविक वासवदत्तेला करावयाचें होतें. यौगंधरायणानें तिची योजना पद्मावतीपाशीं केली होती ती त्याच दृष्टीनें. परंतु कांहीं झालें तरी उदयन तिचा पति होता आणि त्यांचें एक-मेकांवरील प्रेम अकृत्रिम होतें. त्यामुळें पद्मावतीकडे राहूं लागल्यानंतर वासवदत्तेला आपली 'अवंतिके' ची भूमिका वठवितांना मोठे प्रयास पडत होते.

तसें पाहिलें तर ही 'अवंतिका' पद्मावतीची अगदीं अंतरंग-सखी होऊन गेली होती. पद्मावती तिला कधींच आपल्यापासून दूर होऊं देत नसे. त्यामुळें त्यांचीं आपसांत मोकळेपणानें बोलणीं होत.

दर्शक राजानें आपल्या बहिणीचा विवाह उज्जयिनीच्या राजकुमाराशीं करण्याबद्दल विचार चालविला होता. परंतु पद्मावतीला तो पसंत नव्हता. वासवदत्ता तेथें आल्यापासून तर उदयनाबद्दल आडपडद्यानें पुष्कळ बोलणें होई आणि त्यांत वासवदत्ता उदयनाच्या सौंदर्याबद्दल, त्याच्या शौर्याबद्दल, त्याच्या थोरपणाबद्दल पद्मावतीच्या मनांत प्रेम व आदर उत्पन्न होईल असें करी. अर्थात ही गोष्ट वासवदत्तेला मोठ्या सावधगिरीनें करावी लागे. नाहींतर कित्येकदां तिचें गौप्य उघड होण्याची पाळी येत असे.

एक दिवस बोलतां बोलतां एका दासीनें म्हटलें,

"पद्मावती ताईसाहेब उज्जयिनीच्या कुमाराशीं लग्न करायला राजी नाहींत. त्यांच्या मनांत आहे उदयन राजाशीं लग्न करण्याचें."

तें ऐकतांच वासवदत्तेनें विचारलें, "कां बरें? त्याच्यांत असे कोणते गुण पाहिले ताईसाहेबांनीं?" तेव्हां दासीनें उदयनाचें गुणवर्णन केलें. त्यावर दुसऱ्या एकीनें शंका काढली कीं, "तें खरें, पण उदयन सुंदर आहे का?" वासवदत्ता चटकन म्हणून गेली, "होय तर, राजा अतिशय सुंदर आहे."

पद्मावतीला वासवदत्तेच्या या अभिप्रायाचें आश्चर्य वाटलें. तिनें कुतूहलानें विचारलें, "तुला ग काय माहीत?" तेव्हां वासवदत्तेच्या लक्षांत आपली चूक आली. तिनें लगेच स्वत:ला सावरून घेत उत्तर केलें. "तो राजा मोठा सुंदर आहे असें उज्जयिनींतील लोक बोलत असतांना मी ऐकलें आहे."

पद्मावतीला तें खरें वाटलें. ती म्हणाली, "सारी उज्जयिनी उदयनाला ओळखत असणारच. आणि ज्याची सर्वजण प्रशंसा करतात तेंच खरें सौंदर्य."

पद्मावतीच्या मनांत उदयनाशीं विवाह करण्याचें आहे ही गोष्ट दर्शक राजालाहि समजली. राणी वासवदत्ता आतां जिवंत नसल्यानें सवतपणाचाहि प्रश्न उरला नव्हता. त्यामुळें लवकरच दर्शकानें पद्मावतीचा उदयनाशीं वाङ्-निश्चय करून टाकला. पौर्णिमेचा मुहूर्त ठरला. लगीनघाई सुरू झाली.

वासवदत्तेला हें सर्व घडत असलेलें पाहून एकतऱ्हेनें आनंद झाला. एवढे कष्ट सोसून केलेल्या प्रयत्नाला फळ येत असल्यानें तिला असें वाटणें साहजिकहि होतें. परंतु आपण जिवंत असतांना प्रत्यक्ष आपल्या डोळ्यासमोर राजानें दुसरा विवाह करावा हेंहि तिच्या मनाला सहन करणें कठीण जाऊं लागलें. प्रत्यक्ष लग्नाच्या दिवशीं ती राजवाड्यांतून सर्वांची नजर चुकवून उपवनांत निघून गेली आणि तेथें लपून बसली. पण इतर दासींनीं तिला शेवटीं हुडकून काढलीच. कारण राणीनें तिच्याकडे एक खास काम दिलें होतें. विवाहसमारंभासाठीं पद्मावती-करितां एक सुंदर पुष्पमाला 'अवंतिके' नें तयार करावी अशी राणीची आज्ञा होती. 'अवंतिका' त्या कलेंत अगदीं पटाईत होती. अर्थात तें काम आतां वासवदत्तेला टाळतां येण्यासारखें नव्हतें. ती मोठ्या कष्टी मनानें वरमाला गुंफण्याला तयार झाली.

त्या वरमालेंत घालण्यासाठीं दासीनें तिच्या हातीं एक वनस्पति दिली. ती अखंडसौभाग्यकारक असल्याचें दासीनें सांगितल्यावरून वासवदत्तेनें ती पुष्कळशी त्या वरमालेंत गुंफली. परंतु नंतर तशीच दुसरी एक वनस्पती जेव्हां दासीनें तिच्या हातीं दिली तेव्हां मात्र तिनें ती मालेंत गुंफण्याचें नाकारलें. कारण त्या वनस्पतीचा गुण होता सवतीवर विजय मिळविण्याचा ! अखेर ती वर-माला घेऊन दासी जेव्हां तेथून परत गेली तेव्हां राणी दुःखानें उद्गारली, " अरेरे, माझा पतिहि आतां दुसऱ्याचा झाला ! "

२ ...

वत्सराज उदयनाचा विवाह मोठ्या समारंभानें पार पडला. पद्मावती त्याची राणी झाली. राजगृहांत सर्वत्र आनंदीआनंद झाला.

पद्मावती एक दिवस वासवदत्तेला बरोबर घेऊन आपल्या एका दासीसह प्रमदवनांत आली. शेफालिकेचीं झाडें फुललीं आहेत कीं नाहीं हें तिला पाहायचें होतें. बोलतां बोलतां त्या एका कुंजांत शिरल्या. पद्मावतीनें सहज म्हटलें, "माझ्या मनांत नेहमीं येतें कीं, मी जितकी महाराजांवर प्रेम करतें तितकी वासवदत्ताहि करीत होती कीं काय ?"

"तुझ्यापेक्षांहि अधिक प्रेम होतें तिचें," वासवदत्ता भान न राहून बोलून गेली. अर्थातच पद्मावतीनें तिला विचारलें कीं, "हें तुला काय माहीत ?" वासवदत्ता आतां चांगलीच पकडली गेली होती. तरी पण प्रसंगावधान राखून तिनें उत्तर दिलें, "असें नसतें तर आप्तेष्टांना सोडून राजाबरोबर ती निघून नसती गेली." पद्मावतीला तिचें तें म्हणणें पटलें.

पुन्हां बोलणें निघालें तें उदयनाविषयींच. पद्मावती म्हणाली, "मला वीणा वाजवायला शिकवण्याबद्दल मीं म्हटलें तर महाराजांचे डोळे भरून आले. मला वाटतें वासवदत्तेच्या आठवणीनेंच त्यांचें हृदय भारावलें असावें."

वासवदत्तेला तें ऐकून किती बरें वाटलें! त्याचें कारण असें होतें कीं, स्वतः उदयन हा उत्तम वीणावादनपटु होता. त्याच्यापाशीं 'घोषवती' नांवाची एक प्रासादिक वीणा होती आणि त्यानें वासवदत्तेला ती वाजवायला शिकवलेली होती. राजा त्या आठवणीनें कष्टी झाला असेल याची कल्पना वासवदत्तेला आली; आणि आपल्यावरील त्याचें प्रेम तिच्या लक्षांत आल्यानें तिला बरेंहि वाटलें.

पद्मावती व वासवदत्ता यांचीं अशीं बोलणीं चाललीं आहेत तोंच स्वतः राजा उदयन व त्याचा मित्र विदूषक वसंतक हे दोघे प्रमदवनांत विश्रांतिसाठीं आले. वसंतागमनानें नटलेलें तें प्रमदवन पाहून वसंतक हरखला. राजाला वासवदत्तेची आठवण झाली. गप्पागोष्टी करण्यासाठीं कोठेंतरी सांवलीला बसावें म्हणून ते समोर दिसणाऱ्या चमेलीच्या कुंजाकडे वळले.

परंतु राजाला पाहून वासवदत्ता घाबरली. पद्मावतीकडे राहूं लागल्यापासून तिचा असा नियम होता कीं कोणाहि परपुरुषासमोर यावयाचें नाहीं. त्यामुळें राजाच्या दृष्टीला पडूं नये म्हणून पद्मावतीसह ती चटकन त्या कुंजांत शिरली होती. परंतु राजा त्याच बाजूला येत असलेला पाहून ती पंचायतींत पडली. ही अडचण ओळखून बरोबरच्या दासीनें चमेलीची फांदी जोरानें हालवली. त्याबरोबर त्या फांदीवर बसलेले भुंगे एकदम उठले व जवळच सांपडलेल्या विदूषकाला सतावूं लागले. तेव्हां त्यांनीं कुंजांत शिरण्याचा

नाद सोडून दिला आणि ते दोघें तेथें बाहेरच्याच बाजूला एका शिळेवर बसले.

प्रमदवनांतील एकान्त पाहून विदूषकानें राजाला विचारलें, " महाराज, मला हें सांगा कीं, तुमचें प्रेम त्यावेळच्या वासवदत्तादेवीवर अधिक होतें कीं सध्यांच्या पद्मावतीदेवीवर अधिक आहे ? "

राजाला या प्रश्नाचें उत्तर विदूषकापाशीं देण्याची इच्छा नव्हती. कारण या राजश्रींच्या तोंडांत तीळ भिजत नाहीं हें त्याला चांगलें माहीत होतें. परंतु विदूषकानें जेव्हां अगदीं हट्टच धरला तेव्हां त्याला आपलें मन उघडें करावें लागलें.

उदयन म्हणाला, " मग ऐक तर. पद्मावतीचें रूप, गुण व माधुरी यांमुळें मला जरी ती फार प्रिय असली तरी वासवदत्तेनें एकदां जें माझ्या हृदयांत स्थान पटकावलेलें आहे तें पद्मावतीनें हिरावून घेतलेलें नाहीं. "

कुंजाच्या आंतल्या बाजूला पद्मावती व वासवदत्ता दोघीहि होत्याच. त्यांच्या कानावर बाहेर चाललेलें हें सर्व संभाषण पडत होतें. राजानें वसंतकाला दिलेलें उत्तर ऐकून वासवदत्तेला धन्य धन्य वाटलें. ती मनाशीं म्हणाली, " आज माझ्या कष्टाचें फळ मला मिळालें. " परंतु दासीला राजाचें हें बोलणें रुचलें नाहीं. तसें तिनें बोलून

दाखवितांच पद्मावतीनें मात्र राजाचीच बाजू घेऊन म्हटलें, " राजाला अद्यापिहि थोर वासवदत्तेची आठवण आहे यावरून त्याचा थोरपणाच व्यक्त होतो. "

राजानें आपलें मन बोलून दाखविल्यावर उलट विदूषकाला विचारलें कीं, " आतां तू सांग, या दोघींपैकीं तुला अधिक कोण आवडते ? ती वासवदत्ता कीं ही पद्मावती ?" विदूषकानेंहि राजाच्या या प्रश्नाचें उत्तर देण्याच्या बाबतींत पुष्कळ टाळाटाळ करून पाहिली. परंतु राजानेंहि आग्रह धरल्यामुळें अखेर तो म्हणाला, " वासवदत्तादेवीविषयीं माझ्या अंतःकरणांत नितान्त आदरच होता. हें खरें असलें तरी पद्मावतीदेवी सर्व सद्‌गुणांनीं संपन्न आहे. आणि विशेष म्हणजे स्वादिष्ट भोजन तयार ठेवून ' आर्य वसन्तक कुठे बरें गेले ' म्हणून माझी ती प्रेमानें चौकशी करते हा तिचा मोठाच गुण आहे. "

वासवदत्तेनें आंतून हें ऐकलें तेव्हां ती मनाशीं उद्‌गारली, " ठीक आहे, वसंतका, लक्षांत ठेव हें तुझें बोलणें ! " आणि लगेच राजाहि चटकन बोलून गेला " ठीक आहे, ठीक आहे, वसंतका ! हें सारें मी वासवदत्तेला जाऊन सांगतों बरें का. "

वासवदत्तेचें नांव अशा तऱ्हेनें तोंडून निघून गेल्यामुळें उदयनाच्या मनांतील विरहदुःखाचा बांध फुटला. त्याच्या डोळ्यांतून खळखळ अश्रु वाहूं लागले. वसंतकालाहि फार वाईट वाटलें व तो राजाला डोळे धुण्यासाठीं पाणी

आणण्याकरितां गेला. कुंजांतून त्या तिघीहि हें सर्व पाहात होत्या. त्यामुळें राजा दुःखी झालेला पाहून वासवदत्तेनें पद्मावतीला त्याचें सांत्वन करण्यासाठीं पुढें होण्याचा आग्रह केला. पद्मावती राजाजवळ आली तेव्हां वसंतकहि कमळाच्या पानांतून पाणी घेऊन परत आला होता. परंतु राजाच्या डोळ्यांतील अश्रूंचें खरें कारण लपवून त्यानें बतावणी केली कीं, काशफुलांचें पराग डोळ्यांत गेल्यामुळें राजाच्या डोळांतून पाणी आलें आहे.

राजाच्या सांगण्यावरून पद्मावती तेथें बसली. परंतु इतक्यांत वसंतकानें राजाला आठवण केली कीं, आज मगधाधिपति तुमच्या सान्निध्यांत आपल्या स्नेह्यांची भेट घेणार आहेत, तेव्हां आपण तिकडे जायला हवें. म्हणन तिकडे जाण्यासाठीं राजा तेथून उठला.

४ ***

एके दिवशीं राणी पद्मावतीचें डोकें एकाएकीं भयंकर दुखूं लागलें. दासींची धांवाधांव झाली. कोणी तिच्या बिछान्याची व्यवस्था करण्यास गेली, कोणी मलम आणण्यासाठीं धांवली, कोणी अवन्तिकेला बोलवायला पळाली तर कोणी वसंतकाला ही खबर देण्यासाठीं त्याला शोधीत फिरूं लागली.

सागरप्रासादांत पद्मावतीच्या बिछान्याची व्यवस्था करण्यांत आली होती. पण योजनेंत कांहीं चूक झाल्यानें

ती तिकडे आलीच नसावी. मात्र तें कोणाला समजलें नाहीं. सगळ्यांची कल्पना अशीच कीं पद्मावती सागर-प्रासादांतच पडून आहे. राजा उदयनाला वसंतकाच्या तोंडून हें जेव्हां समजलें तेव्हां तो त्याला बरोबर घेऊन तिकडे निघाला. प्रासादांत शिरतांना वसंतक पुढें होता. आंत टाकलेलें पाऊल एकदम मागें घेत तो किंचाळला, "साप ! साप ! महाराज मागें सरा." परंतु राजानें धिटाईनें पुढें होऊन दिव्याच्या मंद प्रकाशांत पाहिलें तों तो साप नसून दारावर बांधलेलें फुलांचें तोरण खालीं पडून वाऱ्यामुळें हालत होतें. मग दोघेहि आंत गेले. परंतु समोर घालून ठेवलेल्या बिछान्यावर पद्मावती दिसली नाहीं. वसंतक म्हणाला कीं, त्या येऊन गेल्या असतील. परंतु राजानें पलंगावरील चादरीला सुरकुतीहि पडलेली नाहीं हें दाखवून त्याचें म्हणणें खोडून काढलें. मग ते दोघेहि पद्मावतीची वाट पाहात तेथेंच बसले. बसल्या बसल्या राजाला पेंग येऊं लागली म्हणून तो त्या बिछान्यावरच आडवा झाला. वसन्तक त्याचें मन रिझवण्या-साठीं त्याला गोष्टी सांगूं लागला. प्रथम त्यानें उज्जयिनीं-तील एक गोष्ट सांगायला सुरुवात केली. पण राजाला वासवदत्तेची आठवण होऊन पुन्हा दुःख होऊं नये म्हणून तो दुसरी सांगूं लागला.

"ब्रह्मदत्त नांवाच्या नगरांत काम्पिल्य नांवाचा राजा राहात असे." वसन्तक सांगूं लागला. तेव्हां राजा म्हणाला, "अरे मूर्खा, ब्रह्मदत्त नगर आणि काम्पिल्य राजा नव्हे !

काम्पिल्य नगर आणि ब्रह्मदत्त हें राजाचें नांव." पण ही गोष्ट सांगायला सुरुवात होतांहोतांच राजाला झोंप लागली. तें पाहून वसन्तक आपल्यासाठीं एखादी चादर आणण्याकरितां तेथून निघून गेला.

अवन्तिकेलाहि पद्मावतीच्या डोकेंदुखीबद्दल समजलें होतेंच. म्हणून तीहि समाचारासाठीं घाईघाईनें सागर-प्रासादाकडे आली. मंद प्रकाशांत तिला दिसलें कीं डोक्यावरून पांघरूण घेऊन कोणीतरी बिछान्यावर झोंपलें आहे. तिला वाटलें पद्मावतीच श्रमानें झोंपीं गेली असेल. म्हणून ती हळूच तिच्या कडेला पलंगावर जाऊन बसली. हिला शांत झोंप लागली आहे तेव्हां उठवूं नये असा विचार करून तीहि तिच्या शेजारींच बिछान्यावर मोकळी जागा होती तेथें पडून राहिली. तिला कल्पनाहि येणें शक्य नव्हतें तेथें तिचा पति उदयनच झोंपला असेल.

इतक्यांत " हे वासवदत्ते! " असें राजा झोंपेंत ओरडला.

वासवदत्ता तटकन् उठून बसत म्हणाली, " हे तर माझे नाथ ! ही पद्मावती नव्हे. मला यांनीं पाहिलें तर नाहीं? जर पाहिलें असले तर यौगंधरायणाच्या प्रतिज्ञेवर पाणीच पडलें म्हणायचें."

" हे अवन्ति-राजपुत्री ! " राजा पुन्हा बडबडला. आतां वासवदत्तेची खात्रीच झाली कीं राजा झोंपेंत बडबडत आहे. त्यामुळें थोडा वेळ त्याच्या सहवासाचें सुख अनुभवीत ती तेथेंच थांबली. त्यानें झोंपेंत विचारलेल्या

प्रश्नांचीं उत्तरेंहि तिनें दिलीं आणि पलंगावरून लटकत पडलेला त्याचा हात नीट बिछान्यावर ठेवून ती तेथून निघून गेली.

वासवदत्तेच्या हस्तस्पर्शानें राजा जागा झाला. "वासवदत्ते ! थांब, थांब " असें म्हणत तो उठून एकदम चालूं लागला. परंतु अंधारांत व अर्धवट झोंपेमुळें त्याचें डोकें दारावर आपटलें. मग मात्र त्याची झोंप उडाली. तो चांगला जागा झाला. तरीपण त्याला हें उमगेना कीं आपण स्वप्न पाहिलें कीं भ्रमानें कांहींतरी दिसलें. इतक्यांत वसंतकहि तेथें येऊन पोहोंचला. त्याला पाहातांच राजा म्हणाला, " मित्रा, तुला एक चांगली बातमी सांगतों. वासवदत्ता नक्की जिवंत आहे. "

परंतु वसन्तकाला वाटलें कीं राजाला भ्रम झाला आहे किंवा स्वप्नांत पाहिलेल्याच गोष्टी तो बडबडत आहे म्हणून तो म्हणाला, " राजा, आतां कुठल्या वासवदत्तादेवी ! त्या तर केव्हांच दिवंगत झाल्या नाहींत का ? "

" छे छे, असें नको म्हणूस अरे, मला चांगला जागा करून ती निघून गेली. ती जळून गेली म्हणूंन रुमण्वानानें मला खोटेंच सांगितलें म्हणायचें. " राजानें त्यावर उत्तर दिलें.

परंतु तरीहि वसंतकाला तें खरें वाटणें शक्य नव्हतें. तो इतकेंहि म्हणाला कीं, " अवन्तिसुंदरी म्हणून एक यक्षीण

या नगरांत आहे ती दिसली असेल तुम्हांला." अर्थात राजाला वासवदत्तेचा स्पर्श प्रत्यक्ष जाणवला असल्यामुळें वसंतकाचें हें सांगणें तोहि मान्य करीना.

इतक्यांत राजा दर्शकाकडून कंचुकी निरोप घेऊन आला. दर्शकाचा निरोप असा होता कीं, 'सेनापति रुमण्वान आरुणीवर चालून जात आहे. त्याच्या दिमतीसाठीं माझें स्वत:चें चतुरंग दळहि सज्ज झालेलें आहे. तेव्हां उठा आणि युद्धावर चला.'

उदयनाच्या शत्रूंत फूट पडली होती आणि वत्सदेशाच्या प्रजेला धीर आला होता. शत्रुपक्षाच्या नाशाची सर्व तजवीज मगधाधिपतीनें करून ठेवली होती. आणि उदयन चाल करून पुढें निघाला कीं त्याची पिछाडी सांभाळण्याचीहि व्यवस्था त्यानें आगाऊच केली होती. त्यामुळें दर्शकानें उदयनाला कंचुकीच्या हातीं कळविलें कीं, "आपलें सैन्य गंगापार झालें आहे. आतां वत्सदेश आपल्या हातांतच आला असें समजा."

हें ऐकून राजालाहि उत्साह वाटला व त्यानें प्रतिज्ञा केली कीं, "मी आत्तांच जाऊन त्या दुष्ट आरुणीचा नायनाट करून टाकतों."

६ ...

आरुणीवर केलेल्या स्वारींत महाराज उदयनांचा जय झाला. यौगंधरायणाच्या इच्छेप्रमाणें उदयन पुन्हां वत्स-

देशाच्या सिंहासनावर आरूढ झाला. त्या विजयानंदाच्या दिवसांतच तो एकदां आपल्या राजमहालांत बसला असतांना कोणीतरी बाहेर वीणा वाजवीत असल्याचें त्यानें ऐकलें. त्यानें तत्काळ ओळखलें कीं हा आपल्या 'घोषवती' वीणेचा नाद आहे. त्यानें त्या फिरस्त्या वीणावादकाला बोलावून घेतलें आणि औत्सुक्यानें विचारलें कीं, ही वीणा तुला कोठें सांपडली ? त्यानें सांगितलें कीं, "नर्मदातीरावर गवतांत अडकून पडलेली ही आम्हांला सांपडली. आपल्या उपयोगाची असेल तर आपण ही ठेवून घ्यावी."

राजानें ती वीणा आपल्या मांडीवर घेतली आणि तो एकदम बेशुद्ध पडला.

इतक्यांत बाहेर प्रवेशद्वाराशीं उज्जयिनीहून चण्डमहासेन राजाचा रैभ्य गोत्रीय कंचुकी आणि वासवदत्तेची लहानपणींची दायी वसुंधरा हीं येऊन पोहोंचलीं. अंगारवती राणीनें आपल्या जांवयाचें अभिनंदन करण्यासाठीं त्यांना पाठविलें होतें.

हीं दोघेंजणें आलीं तेव्हां राजा 'घोषवती' वीणा मांडीवर घेऊन वासवदत्तेच्या आठवणी काढून विलाप करीत होता. त्यामुळें द्वारपालिकेनें त्यांना आंत जाऊं देण्यास प्रतिबंध केला. परंतु कंचुकीनें सांगितलें कीं महाराज ज्यासाठीं विलाप करीत आहेत त्याबाबतींतच कांहीं कामासाठीं आम्ही येथें आलों आहोंत. अखेर त्यांना उदयनापुढें नेण्यांत आलें. राजानें त्या दोघांच्या येण्याची

वर्दी पोहोंचली तेव्हांच पद्मावतीला बोलावणें पाठविलें होतें. तीहि तेवढयांत तेथें येऊन पोहोंचली.

'वासवदत्तेच्या नात्यांतली माणसें तीं माझ्याहि नात्यांतलींच' असें म्हणून पद्मावतीनें आपल्या मनाचा थोरपणा प्रकट केला. परंतु ती म्हणाली कीं, "मी तुमची दुसरेपणाची पत्नी आहें. मला पाहून या उज्जयिनीहून आलेल्या मंडळींना काय वाटेल?" परंतु राजानें सांगितलें कीं, "म्हणूनच तूं येथें बैस. त्यांनीं तुला माझी पत्नी म्हणून न बघण्यांतच अनौचित्य आहे. तेव्हां तूं येथें थांब."

इतकें सांगितल्यानंतर मात्र पद्मावती राजापाशीं येऊन बसली. आपण उज्जयिनीहून महासेनाची राजकुमारी पळवून आणली परंतु तिचें रक्षण करूं शकलों नाहीं, याची खंत राजा उदयनाला वाटत होती. त्यामुळें वडिलांसमान आदरणीय असलेला आपला सासरा आपल्याला काय म्हणेल याची भीति त्याला वाटत होती. त्यावर पद्मावतीनें राजाचें समाधान केलें कीं "ज्याची घटकाच भरली असेल त्याचें रक्षण कोण झालें तरी कसें करणार?"

इतक्यांत उज्जयिनीच्या कंचुकीनें पुढें होऊन उदयनाचें क्षेमकुशल विचारलें. राजानेंहि सासऱ्याची खुशाली विचारली. कंचुकीनें उदयनाच्या विजयाबद्दल त्याचें अभिनंदन करून म्हटलें कीं, "भित्रे आणि दुबळे असतात ते हतोत्साह होऊन हात जोडून स्वस्थ बसतात; परंतु जे उद्योगी पुरुष असतात त्यांच्याच गळयांत राजलक्ष्मी माळ घालते."

अनुक्रम
विभाग

उदयनानें म्हटलें कीं, " हा सर्व महासेन महाराजांचाच प्रभाव आहे. मला विंध्याच्या जंगलांतून पकडून नेलें आणि पोटच्या पुत्राप्रमाणें त्यांनीं माझा सांभाळ केला. त्यांचीच मुलगी मी पळवून आणली आणि तिचें रक्षणसुद्धां मी करूं शकलों नाहीं. ती बिचारी स्वर्गलोकीं निघून गेली. इतकें झालें तरी त्यांनीं आपलें पूर्वीचें नातें कायम राखलें आहे. खरोखरी त्यांच्याच कृपेमुळें मी माझा देश शत्रूकडून जिंकून परत घेऊं शकलों. "

त्यानंतर महाराणी अंगारवतीचा निरोप सांगण्यासाठीं दायी पुढें झाली. तेव्हां राजा वासवदत्तेच्या आठवणींनीं पुन्हां व्याकुळ झाला. त्याला धीर देत कंचुकी म्हणाला, " वासवदत्ता निधन पावली असली तरी आपल्या सतत आठवणींनीं ती खरोखरी जिवंतच आहे. आणि खरें म्हणजे मृत्यूची कुऱ्हाड कोसळली म्हणजे कोण कोणाला वांचवूं शकतो ? जंगलांतल्या झाडांप्रमाणेंच मर्त्य माणसांचेंहि आहे; आज तोडलीं जायचीं उद्यां दुसरीं उगवायचीं ! "

दासीनें महाराणी अंगारवतीचा निरोप म्हणून उदयनाला सांगितला कीं, आपले दोन मुलगे गोपाल व पालक यांप्रमाणेंच तुम्ही आम्हांला आहांत. आतां वासवदत्ता हयात नसली तरी हेंच नातें कायम आहे. वास्तविक वासवदत्ता आम्ही तुम्हांलाच देऊं इच्छित होतों. परंतु तुम्ही तिला रीतसर विवाहविधि होण्यापूर्वींच पळवून घेऊन गेलांत. तेव्हां त्यानंतर आम्हीं तुमचीं चित्रें काढवून तुमचा दोघांचा विवाहविधि साजरा केला. तो चित्रफलक तुमच्या चित्ताला विरंगुळा वाटावा म्हणून तुमच्याकडे पाठविलाआहे.

राजानें कृतज्ञतापूर्वक त्या निरोपाचा स्वीकार करून म्हटलें, " सासूबाईंच्या या प्रेमापुढें शेंकडों राज्येंहि मला तुच्छ आहेत ! "

उज्जयनीच्या दायीनें आणलेला तो चित्रफलक पाहण्याची इच्छा पद्मावतीनें दर्शविली. तेव्हां दायीनें तो तिच्यापुढें केला. त्यावरील चित्रें पाहिल्याबरोबर ती आश्चर्यानें थक्क झाली. तिच्यापाशीं राहात असलेली अवन्तिका अगदीं या चित्रांतल्यासारखीच दिसत होती. म्हणून तिनें औत्सुक्यानें राजाला विचारलें, " ती थोर स्त्री अशीच या चित्रांतल्यासारखीच दिसत होती का? " राजानें उत्तर दिलें, " सारखीच काय, जणू तीच या चित्रांत साक्षात आहे."

पद्मावतीनें आपली शंका बरोबर आहे कीं काय हें पाहाण्यासाठीं स्वतः उदयनाचेंहि त्यांतलें चित्र ताडून पाहिलें. तें राजाच्या तोंडावळ्याशीं तंतोतंत जमतांच तिची खात्रीच झाली कीं आपली शंका बरोबर आहे. त्यासरशीं ती कावरीबावरी होऊन गेली. राजाच्या तें लक्षांत आलें व त्यानें त्याबद्दल तिला विचारलेंहि. तेव्हां ती म्हणाली, " या चित्राप्रमाणें हुबेहुब दिसणारी एक स्त्री माझ्याजवळ राहात आहे."

तिनें तिचा पूर्वींचा इतिहासहि राजाला सांगितला. ' एक ब्राह्मण आपली बहीण माझ्यापाशीं ठेव म्हणून ठेवून गेला आहे. त्याच्या बहिणीचा पति कोठें परागंदा झालेला आहे. त्यामुळें ती कोणाहि परपुरुषासमोर येत नाहीं. " तें ऐकल्यावर राजा म्हणाला, " मग

ती दुसरी कोणीतरी असेल. अशीं एकासारखीं एक माणसें जगांत आढळतात."

इतक्यांत बाहेर एक ब्राह्मण आल्याची वर्दी आली. आपण ठेव म्हणून पद्मावती राणीपाशीं आपल्या बहिणीला ठेवून दिली होती ती नेण्यासाठीं आलों असल्याचें तो सांगत होता. त्यावर पद्मावती म्हणाली, "हाच तो ब्राह्मण असला पाहिजे." लगेच राजानें पद्मावतीला म्हटलें, "त्या स्त्रीला ताबडतोब येथें घेऊन ये." त्याप्रमाणें पद्मावती तिला आणण्यासाठीं अंतःपुरांत गेली. आणि त्या ब्राह्मणानें राजापुढें येऊन त्याचा जयजयकार केला. तो आवाज ऐकून 'हा आवाज आपण पूर्वी कोठेंतरी ऐकला आहे' असें राजाला वाटूं लागलें. परंतु त्यानें उघडपणें तसें न दर्शवितां त्या ब्राह्मणाला विचारलें कीं, "आपण आपली बहीण पद्मावतीपाशीं ठेवून गेलां होतां काय?" त्यावर ब्राह्मणानें "होय" म्हणून सांगितलें.

इतक्यांत अवंतिकेला घेऊन पद्मावती तेथें आली. ती ब्राह्मणाची ही ठेव त्याला परत करणार तों राजा म्हणाला कीं, "याला कोणीतरी दोघे साक्षी असले पाहिजेत. यासाठीं कंचुकी व ही दायी यांच्या साक्षीनें हें काम होऊं दे." त्यामुळें ती दासी अवन्तिकेला पाहाण्यासाठीं पुढें झाली. तिनें तिच्याकडे पाहातांच ती ओरडली, "ही तर वासवदत्ता आहे!"

"कोण, महासेनांची कन्या वासवदत्ता?" राजानें आश्चर्यानें विचारलें. आणि तो लागलीच म्हणाला, "महाराणीनें पद्मावतीसह आंत जावें." परंतु त्या ब्राह्मणानें

याला विरोध केला. तो म्हणाला, "अहो ही माझी बहीण आहे. भरतकुलोत्पन्न ज्ञानी व संयमी राजानें अशाप्रकारें जबरदस्तीनें तिला घेऊन जाणें शोभत नाहीं."

तेव्हां राजा म्हणाला, "मी स्वतःच आतां तिची परीक्षा करतों. तिच्या तोंडावरील पडदा दूर करा."

इतकें झाल्यावर मात्र अवंतिकेच्या वेषांतील वासवदत्ता आणि राजापुढें येऊन उभ्या राहिलेल्या ब्राह्मणाच्या वेषांतील मंत्री यौगंधरायण यांनीं आपापलें खरें रूप प्रकट केलें. ह्या दोघांना आपल्यासमोर प्रत्यक्ष पाहून हें स्वप्न कीं वस्तुस्थिति याबद्दल राजा भ्रमांत पडला. परंतु यौगंधरायणानें आपण हें सर्व कौशाम्बीच्या कल्याणासाठींच केलें असें सांगून राजाची क्षमा मागितली. उलट पद्मावतीनें आपल्या हातून अमर्यादा घडल्याबद्दल वासवदत्तेची क्षमा मागितली.

'पद्मावती ही आपली राणी होणार' असें भविष्य भविष्यवेत्त्यांनीं वर्तविलें असल्यामुळें आपण महाराणीला वेष पालटून पद्मावतीजवळ ठेवलें असा खुलासा यौगंधरायणानें केला. आणि हें सर्व कारस्थान रुमण्वान आदि सर्व मंत्र्यांना माहीत होतें हें त्यानें उघड केल्यानंतर तर राजा थक्कच होऊन गेला. या सर्व उद्योगाबद्दल राजानें यौगंधरायणाची प्रशंसा केली आणि तो म्हणाला कीं, "आतां राणी पद्मावतीसह आपण सर्वजणच उज्जयिनीला महासेन महाराजांच्या भेटीला जाऊं या आणि त्यांना हा कुशल समाचार कळवूं या."

IRBK-0105435

IRBK-0105435